# भारतीय राज्यघटना आणि धर्मनिरपेक्षता

प्रा.डॉ.टी.एम्.पाटील.(राज्यशास्त्र) सदाशिवराव मंडलिक महाविद्यालय मुरगूड — कोल्हापूर
प्रा.शरद विठ्ठल पाटील. न्यू. कॉलेज कोल्हापूर. मो.नं.— ८२७५९१८२६०

..........................................................................................................

**प्रस्तावना:—**२६ नोव्हेंबर १९४९ या दिवशी म्हणजे ६७ वर्षाहून पासून आपण भारतीयांनी राज्यघटना स्वीकारली तिला कायदयाचे स्वरूप दिले आणि नंतर ती घटना देशाला आपणा स्वत:ला बदल केली. त्या घटनेच्या अन्वये आपण असा एक गंभीर निश्चिय केला, की, या मातृ भूमीला सार्वभौम प्रजासत्ताक लोकशाही राज्य बनवु आणि राज्याच्या सर्व नागरिकांना न्याय, स्वातंत्र्य समता आणि बंधुभाव प्राप्त करून देउ या प्रजासत्ताक राज्याच्या मुलभूत रूपरेषांचा विचार करीत असताना आपण काही गोष्ठी विसरले. स्वातंत्र्याचा लढा आपण ज्या तत्वांवर लढलो ती तत्वे कदाचित उत्तरोतर वाढतच जाणार आहेत. अशा विश्वामुळे असेल किंवा हा अनेक पैलूंचा मला आपल्या एकात्मिक समाज रचना असलेलया प्राचीन संसकृतीच्या पायावर भक्कम उभा राहू शकेल, या खात्रीमुळे असेल,

आज स्वातंत्र्य भारताची दुसरी पिठी देशाच्या राज्य कारभारची सुत्रे तिसऱ्या पिठीकडे सोपवण्याच्या तयारीत आहेत.त्या वेळीही सर्वात महत्वाचा प्रश्न अनुत्तारिनच राहतो आहे असे आपल्याला आढळुन येते आहे. हा प्रश्न आशा कि विशेष हक्क असणाऱ्या मुठभर लोकांनी सामाजिक आर्थिक आणि राजकीय न्याय बळकावले आहेत. विचार स्वातंत्र्य, उच्चार स्वातंत्र्य, श्रध्दा व धार्मिक स्वातंत्र्य यांमुळे मानवी आत्म्याची आध्यामिक आणि बौध्दिक नितीतत्वे स्वीकारली जावीत, अशी कल्पना होती. परंतु आज याच गोष्टी माणसाच्या पिळवणुकीची सहज अशी साधने झाली आहेत.

देशातील राष्ट्रजीवनाची वाटचाल करणारी स्वांतत्र्य भारतीय राज्यघटना म्हणजे संविधान २६ नोव्हेंबर १९४७ पासुन देशाला अर्पण करण्यात आले तेव्हापासुन आजतागायत अखंड या विशाल देशाची वाटचाल अत्यंत दिमाखात सुरू आहे, हे संविधान देशाची प्रशासकीय यंत्रणा कार्य प्रणव करण्याचा दस्ताऐवज नसुन एक सामाजिक, आर्थिक परिवर्तनाचे साधन आहे. त्याच बरोबर मानवाची प्रतिष्ठा हक्क, स्वातंत्र्य, समता बंधुता प्रदान करणारा हा एक महत्वाचा दस्तऐवज आहे. म्हणून आज ६७ वर्षाच्या भारतीय स्वातंत्र्याच्या इतिहासात धर्मनिरपेक्षता भारतीय समाजावर कशा प्रकारे अधिराज्य गाजवत आहे हे आपण पाहणार आहोत.

प्रामख्याने भारतीय राज्याघटनेच्या आधारावर धर्मनिरपेक्ष समाजाची निर्मीती होणे आवश्यक होते परंतु धर्मनिरपेक्षने समोर अनेक अव्हानांचा विळखा पडल्यामुळे भारतीय शासन व्यवस्थेमध्ये धर्मनिरपेक्षता ज्या आपेक्षेने निर्माण होणे आवश्यक होत त्या प्रमाणात निर्माण झाली नाही त्यामुळे आपण या शोध निबंधामध्ये धर्मनिरपेक्षता म्हणजे काय तिची आजच्या काळातील उपयुक्तता, धर्मनिरपेक्षता समोरील आजची आव्हने आणि धर्मनिरपेक्षता समाजावर खोलवर रूजण्यासाठी कोणत्या उपाय योजना आखल्या जाव्हात या विषय मीमांसा करणार आहोत.

**संशोधनाची उदिष्टे:—**

**I).भारतीय राज्यघटनेला आनुसरून धर्मनिरपेक्ष या संकल्पनेचा सिध्दांतीक अभ्यास करणे.**

**II).आजच्या काळानुसार धर्मनिरपेक्षतेची उपयुक्तता अभ्यासने.**

**III).धर्मनिरपेक्ष समोरील आव्हानांचा अभ्यास करणे.**

**IV).धर्मनिरपेक्षतेच्या बळकटी करणांसाठी उपाय योजनांचा अभ्यास करणे.**

**संशोधनाची पध्दती:—**सदर शोध निबंधाच्या लेखनासाठी वर्णनात्मक संशोधन पध्दतीचा उपयोग करण्यात आला आहे.

**संशोधनाचे स्त्रोत:—**प्रस्तुत शोध निबंधाच्या लेखनासाठी दुय्यम साधन सामुग्रीचा उपयोग करण्यात आला असुन यासाठी विविध संदर्भ ग्रंथ वर्तमान पत्रके उपयुक्त मासिकांचा योग्य प्रमाणात उपयोग करण्यात आला आहे.

**आशय विश्लेषण :—**

**I).भारतीय राज्यघटनेला अनुसरून धर्मनिरपेक्ष या संकल्पनेचा सिध्दांतिक अभ्यासकरणे:—**

धर्म स्वातंत्र्य हा आलिकडील काळात मान्य केलेला अतंत्य महत्वाचा नागरी हक्क आहे. प्रत्येक व्यक्तिला स्वत:च्या धर्माचे आचरण आणि पालन करण्याचा हक्क असावा ही मुलभूत कल्पना आज बहुतेक देशांनी मान्य केली आहे. आधुनिक काळात धर्मनिरपेक्षाता राज्य कल्पनेचा धार्मिक स्वांतत्र्य हा प्रमुख आधार आहे भारत हे धर्मनिरपेक्ष राज्य असुन भारताने कोणताही धर्म राज्याचा धर्म म्हणून स्वीकृत केला नाही. भारत सर्वे धर्मानां समान मानतो. सर्वे धर्मामाना येथे विचार आचार आणि प्रचार यांचे स्वातंत्र्य आहे. अर्थात या स्वातंत्र्याचा उपभोग घेताना सार्वजानिक सुरक्षितता शांतता आणि नितिमत्ता यांना बाधा होउ नये हे अपेक्षित असते.

**भारतीय संविधानानुसार धर्मनिरपेक्ष राज्य :—**

भारत धर्मनिरपेक्ष राज्य आहे. याचा अर्थ भारतात कोणत्याही विशिष्ठ पंथास, धर्मास, राजापथ नाही. राज्यास धर्म नाही सर्व धर्म राज्याच्या दृष्टिकोनातुन समान आहेत. धर्म पथांच्या आधारावर नागरिकांना फरक केला जाणार नाही भारतातील सर्व नागरीकांना धार्मिक स्वातंत्र्य असेल. आपल्या घटनेने भारतात धर्मातील राज्य निर्माण करण्याचे उध्दिष्ठे मान्य केले आहे भारतात कायदा, स्वातंत्र्य, नीती धर्म, रूढी परंपरा यांचे असे वैशिष्टयपूर्ण नियम झाले आहे की या सर्व गोष्टी मानवी जीवनाचा व समाज जीवनाचा एक महत्वाचा अविभाज्य भाग झालेल्या आहेत.

भारतीय व्यवस्थेच्या स्वरूपाच्या बाबतीत श्री. वेंकटरामन यांनी म्हटले आहे की, भारत धार्मिक राज्य नाही तसेच भारत धर्मविरोधी राज्या नाही. भारत धार्मिक संकिर्णतेच्या विचारापासून दूर आहे व धर्माच्या बाबतीत तटस्त आहे. पंथ, धर्म, निरपेक्षता हे भारतीय राज्य घटनेचे प्रथमपासुन वैशिष्टये असले तरी धर्म निरपेक्षता हा शब्द मात्र घटनेत प्रथम पासुन नाही. धर्मनिरपेक्षता हा शब्द उददेश पत्रिकेत ४२ व्या घटनादुरूस्तीने समाविष्ठ करण्यात आला. ११ मार्च १९९३ रोजी

भारताच्या ९ सदस्य असलेल्या पीठा ते निसंदिग्ध शब्दांत म्हटले आहे की, धर्म निरपेक्षता भारतीय घटनेचा मुलाधार आहे तसेच ते घटनेचे लक्ष आहे. धार्मिक स्वातंत्र्य न्यायलयाने विहित केले आहे. त्यामुळे या तरतुदी मध्ये विरोध करता येत नाही.

**भारतीय राज्यघटनेच्या आधारावर धार्मिक स्वातंत्र्याचा अधिकार :—**

भारतात विविध धर्माचे लोक राहतात. भारतातील सर्व लोकांच्या धर्म भावनांचा योग्य आदर ठेवणे हे संविधान कारांनी स्वत:चे कर्तव्य समजून भारत हे सर्व धर्मविषयी समदृष्टी ठेवणारे राज्य असले पाहीजे. असे ठरविले आणि भारताच्या प्रास्तविकेतच भारतीय गणराज्य हे निधर्म गणराज्य आहे हे स्पष्ट केले आहे भारतीय राज्यघटनेच्या तिसऱ्या विभागात कलम २५ ते २८ मध्ये धार्मिक स्वातंत्र्याच्या तरतुदी दिलेल्या आहेत.

**कलम २५ प्रमाणे :—** "सार्वजनिक सुव्यवस्था नितीमत्तायांना बाधा नसणाऱ्या बाबतीत सर्व हक्क आहेत आणि धर्माचा उच्चार आचार आणि प्रचार करण्याचा हक्क आहे."

**कलम २६ प्रमाणे :—**"सार्वजनिक सुव्यवस्था नितिमत्ता व आरोग्य यांना बाधा न येईल अशा रीतीने प्रत्येक धार्मिक संप्रदायास पुढील अधिकार असतील.

अ. धार्मिक संस्था व्यापन करणे व चालविणे. ब. धार्मिक बाबतीत स्वत:चा कारभार पाहणे. क. स्थावर व जंगम संपत्तीची मालकी असणे व ती संपादन करणे. ड. कायदयानुसार सदर संपत्तीचा कारभार पाहणे.

**कलम २७ प्रमाणे :—**"ज्या कराचे उत्पन्न एखादया विशिष्ट धर्माच्या अगर धर्मपंथाच्या संवर्धनासाठी आणि प्रचारासाठी रचिले जाण्याची विशिष्ठ योजना असेल तर असा कर देण्याची कोणत्याही व्यक्तिवर सक्ती केली जाणार नाही." विशिष्ठ धर्माच्या किंवा पंथाच्या प्रचारासाठी कर बसविता येणार नाही परंतु सर्व धर्मांना सारखीच मदत करण्यासाठी कर बसविता येईल (उदा. जगन्नाथ देवालयाच्या ट्रस्ट विरूध्द ओरिसा राज्य या खटल्याचा निर्णय)

**कलम २८ :—**मध्ये असे स्पष्ट करण्यात आले आहे की, "पूर्णपणे सरकारी खर्चावर चालणाऱ्या शिक्षणसंस्थेत कोणतेही धार्मिक शिक्षण दिले जाणार नाही. बिनसरकारी शिक्षण संस्थातून असे शिक्षण देण्यास कोणतीही हरकत नाही. परंतु हे घेतलेच पाहिजे अशी सक्ती कोणाही विदयार्थ्यांवर करता येणार नाही."भारतीय घटनेत धार्मिक स्वातंत्र्याचा आधिकार देण्यात आला असला तरीही भारताने धर्मातील राज्याची कल्पना स्वीकारलेली आहे. सर्वधर्मसमभाव या वृत्तीने राहुन धर्मनिरपेक्ष राज्याची कल्पना साकार करण्याचे ध्येय घटनेने स्वीकारलेले आहे नागरिकांना काही प्रमाणात धार्मिक स्वातंत्र्य देउन आणि आवश्यकतेनुसार त्या स्वातंत्र्य मर्यादा ठेवून राज्या सामाजिक सुधारणा करण्याचा प्रयत्न करीत आहे. धार्मिक, रूढ, प्रथा व परंपरा आणि सामाजिक सुधारणा यातील संबध कमी करून राज्य धर्मातील राज्य प्रस्थापित करण्याचा प्रयत्न करीत आहे. समानता, स्वातंत्र्य, बंधुता या तत्वांचा अंगीकार करून राज्याने धर्म निरपेक्ष राज्य स्थापन करण्याचे उदिष्ठय मान्य केलेले आहे. त्यामुळेच राज्याकडुन धार्मिक स्वातंत्र्यावर मर्यादा घालण्यात आलेल्या आहेत. अर्थात, अशा मर्यादामुळे व्यक्तिच्या धार्मिक स्वातंत्र्यावर अमर्याद बंधने पडणार नाहीत याविषयी राज्यकडुन दक्षता घेतली जाते. एकंदरीत धर्मनिरपेक्ष राज्याचा पुरस्कार करून आपण घटनेच्या आधारावर राष्ट्राची प्रगति करण्याचे धोरण संविधान कर्त्योंनी राबविलेले होते.

**II).आजच्या काळानुसार धर्मनिरपेक्षतेची उपयुक्तता :—**

स्वातंत्र्योत्तर काळात भारत हे एक राष्ट्रराज्य असेल याविषयी फारसा वाद नव्हता. हिंदुराष्ट्रवादाचा पुरस्कार तेव्हाही संघ करीत असे पण राजकीय क्षेत्रात हा मुद्दा फारसा कोणी गंभीरपणे घेत नसे. आधुनिक लोकशाही राष्ट्रम्हणुन जर राहायचे असेल तर राज्यसंस्थेतेने धर्मनिरपेक्ष राहीले पाहीजे असे स्वातंत्र्योत्तर काळात मानले गेले. इंदिरा गांधीनी १९७६ मध्ये घटनादुरूस्ती करून घटनेच्या प्रस्तावनेत 'धर्मनिरपेक्ष राज्य' हे एक उदिष्टये समाविष्ट केले तेव्हाही त्या उदिष्टा बदल फारसा वाद नव्हता एकीकडे राज्य संस्थेविषयी एकवाक्यता असताना सरकार अल्प संस्थाकांना झुकते माप दिले असा गैरसमज एका गटाकडुन नेहमीच जोपासला गेला त्याच बरोबर धर्म आणि राजकारण या संबंधा विषयी कायम होतीच यामध्ये १९४७ मध्ये धर्माच्या आधारावर भारताचे फाळणीत रूपांतर झाले आणि पाकिस्तान निर्माण झाला.धर्म आणि राजकारण एकत्र आल्या नंतर काय होते याची आनुभुति आपण आनुभवली आहे या सर्व प्रसंगी 'सेयुलॅरिअम' म्हणजे धर्मनिरपेक्षतेची विचार सरणी अंगीकारणे उपयुक्त आहे. आजच्या काळात धर्मनिरपेंक्षता खालील गोष्टींसाठी उपयुक्त आहे. भारतीय संघराज्याच्या विकासाठी अल्पसंख्या समुहांना राष्ट्रीयत्वाची भावना वाढीस लागण्यासाठी लोकशाहीच्या मुल्यांचा विकास होण्यासाठी

**१.भारतीय संघराज्याच्या विकासाठी :—**पाश्चात्याच्या धरतीवर आपण संघराज्य शासन पध्दती स्वीकारली असली तरी धर्मनिरपेक्षतेंचे असेही एक प्रारूप आहे. जे पुर्णपणे पाश्चात्य नाही अतिशय धार्मिक अशा विविध समाजांची गरज भागवते. व त्याचवेळी स्वातंत्र्य, समता व बंधुत्वाच्या संपकल्पना देखील सुसंगत असते. ते आहे भारतीय प्रारूप पाश्चित्य जगात मुख्यात: एकाच धर्मातर्गत विविधता दिसते. परंतु भारतात विविध धर्म आहेत. म्हणजे एकाच धर्माच्या विविध रूपाबाबतच नव्हे तर विविध धर्माबाबतच्या गोष्टीचा विचार करणारे आणि त्यांच्याही गरजा भागवणारे प्रारूप आहे. याच प्रारूपाच्या आधारावर आपण घटनेच्या आधारावर संघराज्याची निर्मीती केली.

संघराज्यामध्ये लोकशांही, लोकशाही मूल्ये, लोकशाही वृत्ती लोकशाही समाज आणि लोकशाही व्यक्ती हे सारे एकरूप व एकसारखे असल्याशिवाय लोकशाही शासन, प्रशासन लोकशाही व्यवस्था व तिचे अपेक्षित लाभ समाजातील प्रत्येका पर्यंत पोहचणे ही अशक्य प्राय गोष्ट आहे. यासाठी संघराज्यात लोकशाहीची मुल्यांच्या आधारावर धर्मनिरपेक्षता निर्माण करून आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक आधारावर संघराज्याचा विकास होण्यास मदत होईल. भारतीय संघराज्यात प्रामुख्याने भाषावर प्रांत रचना करण्यात आली आहे. या भाषेवार प्रांत रचनेला जाती धर्माच्या आधारावर विभक्त करण्यात आले आहे. संघराज्यात अनेक जाती, धर्म पंथ व भाषा यांनी व्यापले आहे.त्यामुळे संघराज्यात लोकांच्या मतात धर्मनिरपेक्षतेची भावना निर्माण झाल्यास भारतीय संघराज्याचा विकास होण्यास मदत होईल. त्यामुळे संघराज्याच्या

विकासासाठी राज्यघटनेच्या आधारावर देशात धर्मनिरपेक्षता निर्माण करून लोकांच्या मतात राष्ट्रप्रेमाची जागृती करता येईल. म्हणून आजच्या काळात धर्मनिरपेक्षतेची उपयुक्तता आहे.

**२.अल्प संख्याक समुहांना राष्ट्रीयत्वाची भावना वाढीस लागण्यासाठी :—**

भारतात प्रामुख्याने अनेक जाती, उपजाती धर्म पंथ आहेत. आणि हेच भारताच 'विविधतेच एकता'या तत्वाचा पुरस्कार करत आहेत. परंतु आलिकडील काही काळात प्रास्थापित सामाजिक घटकांच्या कडून विस्थापित सामाजिक घटकांच्यावर अन्याय अत्याचार होत आहे हे आपण पाहिल आहे यातुन भारतीय राज्यघटनेत ४२ व्या घटनादुरूस्ती नुसार बदलण्यात आलेल्या धर्मनिरपेक्ष राज्याचा विकास ज्या प्रमाणात व्यवसाय पाहिजे त्या प्रमाणात झाला नाही. कारण आज सुध्दा आपल्या देशात अनेक समाज घटकांना राष्ट्रयत्वाची भावना वाढीस लागली नाही आज समाजातील काही वर्गीना असहिष्णू जाणीव होत आहे. याचा परिणाम भारतात सामाजिक जिवनावर पडण्याची शक्यता आहे त्यामुळे भारतात सामाजिक आणि राजकीय व्यवस्था चांगल्या प्रकारे निर्माण होण्यासाठी आज देशातील अल्पसंख्याक समुहा मध्ये राष्ट्रीयत्वाची भावना वाढीस लागणे. गरजेचे आहे. आणि याच साठी आजच्या काळात धर्मनिरपेक्ष मूल्यांची जपणूक होणे उपयुक्त आहे.

**३.लोकशाही मुल्यांचा विकास होण्यासाठी :—**भारताने धर्मनिरपेक्ष राज्यांची संकल्पना स्वीकारली असली व धर्म व राज्य यात विभाजन करण्यात आले असले. तरी प्रत्यक्ष व्यवहारात मात्र राज्यकर्त्यांनी धर्माचे राजकियकरण केलेले दिसुन येते. राज सत्तेने धर्मसत्तेवर नियंत्रण करू पाहत आहे. मत पेठी निर्मितीसाठी धार्मिक अभिजनांचा वापर सगळेच राजकीय पक्ष करताना दिसतात. साधू, साध्वी, मौला, महेत, अवलिया, आचार्य, मौलावी व प्रभुतीचा निवडणुक प्रचारातील सहभाग अभुतपूर्व वाढला आहे. यातून राजकीय पक्ष तत्कालीन स्वार्थी साधत असले तरी भारतीय राजकीय लोकशाहीचे अतोनात नुकसान होत आहे. यातुन सांप्रदायीकता वाढून धर्मनिरपेक्षतेचे तत्व मागे पडत आहे. यावरती सर्वात प्रभावी उपचार म्हणजे भारतीय समाजात धर्मनिरपेक्ष मुल्यांचा विकास होणे. आवश्यक आहे यातुन समाजातील सहिष्णु आणि असहिष्णुता यातील वाद संपुष्ठात येउन भारतात आपेक्षित लोकशाहीची निर्मीती होईल. यासाठी आजचा काळात धर्मनिरपेक्षच्या आधारावर लोकशाही मुल्यांचा विकास होणे आवश्यक आहे.

**III).धर्मनिरपेक्षतेच्या समोरील आव्हानांचा अभ्यास करणे:—**

**—धर्माचे राजकारण :—**भारत हे धर्मधिष्ठीत राष्ट्र नाही. येथे अनेक धर्माचे लोक राहतात. या सर्वाच्या नागरिकत्वाचा दर्जा समान आहे. स्वातंत्र्य भारताने स्वत:साठी धर्मनिरपेक्ष संविधानाची निवड केली आहे धर्मनि खरे पाहता समाजाला एकत्र धरून ठेवण्याचे कार्ये होत असते. पण या देशात मात्र अनुभव वेगळा आहे इथे धर्म संघटना विघटनात्मक शक्ती म्हणून कार्य करताना पहावयास मिळतात. एकादा धर्मातेच्या राजकाराणामुळे या देशाचे दोन तुकडे झाले. तरी त्या पासुन हा देश फारसे काही शिकल्याचे आढळत नाही. आजवरचा इतिहास पाहता देशात धर्माचेच राजकारण अनुभवले आहे हे सर्वात मोठे आव्हान धर्मनिरपेक्षते समोर आहे.

**— राज्य सत्तेचा अधिकार :—**समाज हिताखातर धार्मिक क्षेत्रात हस्तपेक्ष करण्याचा अधिकार अर्थातच राज्यसत्तेला आहे. आणि त्या दृष्टिने तिचा अधिकार धर्म संस्थेपेक्षा निर्विवरपणे वरचढ आहे. याचा फायदा राज्यासत्ते मधील सत्ताधारी वर्ग घेतात. आणि समाजात आपल्या पक्षाच्या वाढीची धोरण ठरवतात. त्यामुळे समाजात धर्मधिष्ठीत गटाचे प्राबल्य वाढते. या वाढलेल्या शक्तिच्या जोरावर समाजात धर्माचे राजकारण होते. त्यामूळे राज्यसत्तेने आपले आधिकार योग्य प्रमाणात वापरले पाहीजेत. सुध्दा मुददा धर्मनिरपेक्षतेच्या विकासातील महत्वाचे आव्हान आहे.

**— जमातवादयाची भुमिका :** धर्माचा राजकारणासाठी वापर करून देतात. त्यांना जमातवादी म्हणून ओळखले जाते. जमातवादयांना राष्ट्र किंवा राष्ट्रराज्य या पेक्षा धार्मिक समुदाय हाच राजकीय निष्ठांचा केंद्रबिदू वाटतो.जमातवाद हा राजकीय समिहातील भाग असल्यामुळे जमात वादयांना धर्माशी किंवा धर्मिक तत्वांशी काहीही घेणे देणे नसते. जमातवाद बहुसंख्याकांचा असो की अल्पसंख्याचा असो राष्ट्रीय एकात्मतेचा बरोबर धर्मनिरपेक्षतेसाठी सारखाच घातक असतो. दोन्ही प्रकारच्या कडव्या धर्माधांचे भारतीय संविधानातील धर्म निरपेक्षतेच्या तत्वाशी सारखेच वावडे असते.

**—धार्मिक अल्पसंख्याक:—**हिंदु बहूसंख्याक असलेल्या भारतात मुस्लिम, खिस्ती, पारशी, शीख, दाउदी बोहरा वगैरे अनेक जाती आहेत. प्रत्येकाला भारतीय संविधानाने धार्मिक आचार प्रचाराचे स्वातंत्र्य दिले आहे. इथली राज्यव्यवस्था धर्मनिरपेक्ष असल्यामुळे राज्यव्यवस्थेचा असा कोणताही धर्म नाही. धार्मिक आधारावर व्यक्ती — व्यक्तीत भेदभाव न करण्याची हमी राज्य व्यवस्थेते दिली आहे पण असे असुनही या धार्मिक अल्पसंख्याकांच्या मनातली सुस्थिततेची भावना कमी झालेली नाही विशेषत: मुस्लिम हा जो सर्वात मोठा असा अल्पसंख्याक गट आहे तो भारताच्या मुख्य प्रवाहीशी आजतागायत समरस होउ शकलेला नाही त्यामुळे धर्मनिरपेक्षतेच्या संदर्भात प्रामुख्याने हिंदू—मुस्लिम व हिंदू—शीख यांच्यातील संबंधाचाच विचार करणे आवश्यक आहे.

**—हिंदू बहुसंख्याकांची भुमिका :—**हिंदू समाज बहुसंख्याक असल्यामुळे धर्म निरपेक्षतेच्या संदर्भात त्याची जबाबदारी मोठी आहे. मुस्लिमांमधील धर्मनिरपेक्ष शक्ती बळकट करूनच जमातवादाचा मुकाबला करता येईल पण प्रत्यक्षात असे दिसते की मुस्लिमच्या प्रथक मानसिकतेच्या निर्मितीत हिंदू बहूसंख्या फार मोठे योगदान करत असतात. रामजन्मभूमी की बाबरी मशीद यासारख्या गौण प्रश्नाला अवाजवी महत्व प्राप्त होते. तसेच मुसलमान नमाज पडतात. म्हणून हिंदूनी महाआरती करावी. मुस्लिमांचे डोले मिरवतात तसे गणपतीचे प्रमाण आणि 'उत्साह' वाढावा अशा काही घटना हिंदू बहूसंख्या कडून होत आहे यातून मुस्लिम बांधवांच्यामध्ये अपूरतेची भावना निर्माण होत आहे. यातून धर्मनिरपेक्षता समाजात निर्माण होण्यात अडचण येते.

**— जातीयतेची समस्या :—**धर्माधतेखरीज जातीयता, भाषिकता, प्रोरशिकता इत्यादी संकुचितनांमुळे ही धर्मनिरपेक्षतेच्या प्रक्रियेचीगती अवरूध्द होत असते. भारतात धर्माच्या आधारे तर तठबंध्दा आहेतच आणि अंतर धर्म समुहांचे संबंध तणाव पूर्णही आहेतच पण तेवढयावरच हे संपत नाही प्रत्येक धर्माच्या अनुयायांमध्ये या देशात अनेक जाती उपजाती आहेत

आणि या जाती उपजाती आपासात स्पर्धा, कलह, संघर्ष करीत असतात. भारतीय सामाजिक घडण लोकशाही प्रणीत समानतेवर करण्याआड ही जातीयता प्रामुख्याने येत असते. जातीयतेचे सामाजिक आणि धार्मिक स्वरूप पूर्वी पेक्षा काहीसे कमी भयंकर व कमी जाचक होताना दिसते. पण त्याच वेळी तिचे राजकीय व प्रशासकीय स्वरूप मात्र अनेकांना चिंताजनक वाटते आहे. स्वातंत्र्य प्राप्तीनंतर भारताने आपले संविधान तयार केले 'संचित विषमता' असे ज्या जाती समाजाचे वास्तव हजारों वर्षापासून उत्क्रांत होत आले होते. तेथे अगदी दुसऱ्या टोकाची म्हणजे समताधिष्ठीत समाजरचना निर्माण करण्याचा संकल्प भारतीय संविधानाने सोडला व्यक्तिचा जन्मसिध्द दर्जा नाकारून नागरिक हा सर्वासाठी समान प्रतिष्ठा देण्याचा दर्जा निर्धारित केला. पण तरी सुध्दा जातीचा प्रभाव टिकुनच राहिला त्यामुळे ''बदलत्या'' परिस्थितीशी नुसार घेण्यातुन टिकून राहिलेली एक पुरातन संख्था असे जातीचे वर्णन भारतीय राजकारणाच्या संदर्भात करण्यात आले आहे.भारतीय धर्मनिरपेक्षते मध्ये वरचढ जातीचे राजकारण, मध्यम जातीचे राजकारण, मंडल आयोगाच्या, शेफारशी जात, राजकारण संबंध जातीचे नवे आधार विविध राजकीय पथांची भुमिका या सर्वा प्रवाहातुन भारतीय धर्मनिरपेक्षच्या चौकशीला आव्हान मिळत आहे.

**IV).धर्मनिरपेक्षतेच्या बळकटीसाठी (वाढीसाठी)आवश्यक उपाय योजनांचा अभ्यास :—**

**भारतीय धर्मनिरपेक्षता अधिक मजबूत करण्यासाठी खालील उपाय योजना आवश्यक आहेत.**

१.भारतीय धर्मनिरपेक्ष समाजात हिंसात्मक बाबी वाढत असून, अशा हिंसा निर्माण करणाऱ्या व्यक्ति किंवा समूह याच्यावर न्यायलयाच्या मार्फत आवश्यक कारवाई होने आवश्यक आहे.

२.सांप्रदायिकता निर्माण करणाऱ्या व्यक्ति व संघटना यावर कठोर कारवाई करावी. व धर्मनिरपेक्षतेच्या तत्वाबदल विश्वास निर्माण करावा.

३.संसद व विधानमंडळाच्या सदस्यांनी धर्माच्या आधारावर राजकारणात वाक्यता करूनये अशा प्रकारची विधाने आल्यास संबधित व्याक्तिवर निवडणूक आयोगा मार्फत कारवाई करण्यात यावी.

४.निवडणूकी प्रक्रियेत सुधारणा हव्यात पक्ष उमेदवार यांच्या कडून प्रखर प्रमाणात धर्मनिरपेक्ष मुल्यांचा प्रचार करण्यात यावा.

५.राजकीय नेतृत्वांना व प्रशासनाला अधिक जनते प्रती जबाबदार बनविण्यात यावे यासाठी राजकीय जागरूकतेसाठी विशेष प्रयत्न केले जावेत.

६.शासकीय योजनांची अंमलबजावणी अल्पसंख्या, भागास व आर्थिक दृष्टया मागास समाजात प्रभावीपणे करण्यात यावी.

७.राजकारणातील राजकीय वंशवाद समाप्त करून सामान्य जनतेला सहभागी करून घ्यावे निरंकशव समाजवादी प्रवृत्ती समाप्त केल्या जाव्यात.

८.दारिद्रय बेकारी व आर्थिक विषमता कमी करण्यासाठी आवश्यक ते कायदे योजना करून प्रयत्न करावेत.

९.भारतीय गणराज्याचा विकास सारख्याच प्रमाणात सर्व जाती — धर्मातील व्यक्तिच्या पर्यंत करण्यात यावा यामध्ये प्रदेशीक प्रेम, जाती प्रेम, जमात प्रेम, या आधारावर राजकीय नेतृत्वाने विकास करू नये राजकीय नेतृत्वाने धर्मनिरपेक्षतेच्या आधारावर पूर्ण देशाचा विकास करावा.

१०.कायदेमंडळ कडून निर्माण होणारे कायदे कार्यकारी मंडळाने योग्य प्रकारे आमलात आण्यावेत. यामध्ये काही दोष राहील्यास न्याय मंडळाने आपल्या अधिकार क्षेत्राचा वापर करून ते कायदे प्रभावी पणे आमंलात आणावेत. वरील उपाय योजनांच्या आधारावर धर्मनिरपेक्षता समाजात प्रभावी पणे निर्माण होईल.

**निष्कर्ष:—**धर्मनिरपेक्षता म्हणजे धर्मला नाही किंवा धर्माचे अस्तिव संपवण्याचा संकल्पही नाही तर सार्वजनिक जीवनात धर्माबाबत कोणती भुमिका घ्यायची याबदलची ती तात्विक चौकशी आहे. आज भारतीय समाजात धर्माच्या आधारावर अनेक शक्ती आपले वर्चस्व निर्माण करताना दिसतात त्यामुळे प्रस्तुत लेखात आपण धर्मनिरपेक्षता म्हणजे काय तिची आजच्या काळानुसार उपयुक्तता तीच्या समोरील आव्हाने आणि धर्मनिरपेक्षता समाजात बळकट करण्याचे उपाय अभ्यासले आहे. वैविध्यपूर्ण सामाजिक रचना व संस्कृती असणाऱ्या भारतासारख्या लोकशाही देशात म्हणून एका बाजूला अभिव्यक्ती स्वातंत्र्य पाहिजे तर दुसऱ्या बाजुला ज्या धर्माधनेमुळे असहिष्णुता व हिंसा निर्माण होते. अशा कोणत्याही गोष्टीला न्यायालयीत सौरक्षण असु नये तसे झाल्यास, संतुलित, वास्तववादी, बुध्दिवादी, अहिंसक, शांततावादी विचारवंतांचे हकनाक बळी जातात. हे बळी थांबवण्यासाठी भारतीय घटनेच्या आधरावर प्रभावीपणे धर्मनिरपेक्ष मुल्यांचा विकास कार्यकारी मंडळाकडून झाला पाहिजे.

संदर्भ:—

१ डॉ.भास्कर लक्ष्मण भोळे, भारतीय गणराज्याचे शासन आणि राजकारण, पिपळापूरे एन.के.नागपूर
२ जी.एन. शेषन, व्यथिम मनानं सांगावसे वाटत की
३ डॉ. बी. वाय कुलकर्णी, भारतीय संविधानात शासन व राजकीय प्रक्रिया,
४ प्रा.बी.बी पाटील, प्रा. सौ.उर्मिला चव्हाण. भारतीय शासन आणि राजकारण
५ सुहास पळशीकर, समकालीन भारतीय राजकारण
६ योजना (मराठी मासीक) ऑगस्ट २०१३ विशेषांक समावेशक लोकशाही
७ डॉ. अरूणा देशमुख, एकविसाव्या शतकातील बदलते समाज आणि राजकारण.